MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.
CIN No.U40109MH2005SGC153646

# महापारेषण समाचार

वर्ष : १८ अंक : ५ पाने : ८ ऑगस्ट-सप्टेंबर २०२३ www.mahatransco.in Follow us on :

**प्रिय कर्मचारी बंधू आणि भगिनींनो,**

चालू वर्षात अधिक क्षमतेने आपण ठरविलेल्या लक्ष्यांना (Targets) प्राप्त करण्याचा सर्वतोपरी प्रयत्न कराल, याची मला खात्री आहे. कंपनीतील प्रत्येक विभागाकरिता ठरवून दिलेली लक्ष्ये (Targets) गाठण्यात आपल्याला यश येईल, याबद्दल मी आशा बाळगतो. विविध धोरणात्मक निर्णय घेऊन आपण आपल्या कार्यप्रणालीमध्ये सुधारणा करण्याचा प्रयत्न केला. त्याला भविष्यात चांगले यश मिळेल, याची मला खात्री आहे. यामध्ये सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आपले मोलाचे योगदान देऊन सहकार्य केले आहे, हे विसरून चालणार नाही.

- **कामांचा नियमित आढावा घ्या**
- **कामांचे योग्य नियोजन करा**
- **विविध अडचणींवर मात करा**
- **सांघिक भावना कायम ठेवा**

विकासाचा वेग पकडताना आपण आपली कार्यक्षमता वाढवून कामाची अधिक गुणवत्ता व वेग वाढविणे गरजेचा आहे. स्पर्धात्मक युगातही आपल्या आघाडीचा स्तर कायम ठेवण्याची जबाबदारी आपणा सर्वांवर आहे. वीज पारेषण क्षेत्रात महाराष्ट्र राज्य नेहमीच अग्रेसर आहे. विविध योजना व तंत्रज्ञानाचा वापर अधिक सहजतेने करण्याचा आपला मानस असला पाहिजे. त्याप्रमाणेच महापारेषणने नेहमीच नवे तंत्रज्ञान व आधुनिक प्रणालीचा वापर केला आहे. त्या सर्व प्रयत्नांचा आपल्या कंपनीच्या प्रगतीमध्ये मोलाचा वाटा आहे.

कंपनीची प्रगती करणे ही जशी व्यवस्थापनाची जबाबदारी आहे, तशीच ती प्रत्येक अधिकारी, अभियंता व कर्मचाऱ्यांची देखील आहे. सर्व कर्मचारी हे संघटनात्मक स्तरावर आपले संपूर्ण कौशल्य पणाला लावून या कंपनीच्या प्रगतीत मोलाचा हातभार लावू शकतात. महापारेषणचे कर्मचारी हे त्यांच्या विशेष तांत्रिक ज्ञानाने व कुशलतेने परिपूर्ण आहेत. अनुभवी कर्मचारी मोठ्या कुशलतेने आपली यंत्रणा सांभाळण्याचे काम करत आहेत, याची मला खात्री आहे. प्रशासन कालबध्द पध्दतीत परिमंडळाची आढावा बैठक घेत आहे. त्यामुळे याचा फायदा यंत्रणेला चालना देण्यास होत आहे. आपण केलेल्या विविध कामांचे सादरीकरण प्रशासनासमोर करण्याची संधी आपणास या बैठकांमधून मिळते, याचा आपण अधिकाधिक उपयोग करून घ्यावा, असे मला वाटते. क्षेत्रीय कार्यालयांना कोणत्या प्रकारची मदत किंवा साधनसामुग्रीची गरज असेल तर ते समजून घेऊन त्यावर योग्य ती उपाययोजना या बैठकांतून करता येते. प्रत्येक वरिष्ठ कार्यालयाने त्यांच्या अंतर्गत असलेल्या कनिष्ठ कार्यालयांशी अशाच प्रकारच्या बैठकांच्या माध्यमातून समन्वय साधून कंपनीच्या एकंदरीत कार्यक्षमता वाढविण्यास हातभार लावला पाहिजे, असे मला वाटते.

सुयोग्य व्यवस्थापनाकरिता कोणतेही काम हे वेळ व कामाचे विभाजन या दोन घटकांत मोजणे गरजेचे ठरते. त्यासाठी विविध माध्यमांतून आढावा बैठक घेतली जाते. त्यासाठी कामाचे योग्य व्यवस्थापन हे परिमंडळ, मंडळ व उपमंडळ अशा विविध पातळींवर सुक्ष्मपणे होणे गरजेचे आहे. त्याकरिता आपल्या कर्मचाऱ्यांचा अनुभव व अंमलबजावणी क्षमतेचा चांगला उपयोग करून घेणे गरजेचे ठरते. सांघिक कार्यालय हे महापारेषणचा अतिमहत्त्वाचा भाग आहे. काम आणि कामांचे अनुकरण याबाबत कार्यालयाने उत्तम उदाहरण घालून दिले पाहिजे. हे कार्यालय मानकीकरण व सुस्पष्ट मार्गदर्शक तसेच कार्यासंदर्भातील नामांकने क्षेत्रीय कार्यालयाकरिता तयार करते. उत्पादकता व परिणाम, वेळेवर प्रस्तावांची मंजुरी यामध्ये प्रत्येकाची भूमिका महत्त्वाची आहे.

देशाचे नियोजन हे प्रत्येक राज्याच्या नियोजनात्मक कामगिरीवर देखील अवलंबून असते. विविध प्रकल्पांची कामे वेळेत व गुणवत्तापूर्ण करून आपण देशकार्यात हातभार लावत असतो. महापारेषणच्या विविध प्रकल्पांची कामे योग्यरित्या सुनियोजन करून पूर्ण करणे, हे आपले महत्त्वाचे कार्य आहे. महत्त्वाकांक्षी टप्पे गाठताना यंत्रणेचे मजबुतीकरण, सुव्यवस्था व अपघातशून्य कार्यक्षेत्र हे घटकसुध्दा तितकेच महत्त्वाचे असतात. कोणतीही जोखीम न घेता निर्देशित केलेल्या कार्यप्रणालीनुसार काम करणे गरजेचे असते.



डॉ. संजीव कुमार (भा.प्र.से.)
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

आज वीजक्षेत्रामध्ये बऱ्याच आव्हानांना सामोरे जावे लागत आहे. ग्राहकांना त्यांच्या गरजेनुसार गुणवत्तापूर्ण सेवा देण्यास आपण कटिबध्द असले पाहिजे. विविध आव्हाने लक्षात घेऊन त्यावर मात करण्यासाठी आपण सदैव तत्पर असले पाहिजे. आधुनिकीकरणाची गती वाढत असतानाच गुणवत्ता, कार्यतत्परता व कामाप्रती निष्ठा ठेऊन काम पूर्णत्वास नेणे, हे अत्यंत महत्त्वाचे आहे. सांघिक यशाकरिता सकारात्मकता, नवनवीन गोष्टी शिकण्याची आस व निरंतर सुधारणेसाठी प्रयत्न. या तिन्ही गोष्टी आपल्या कंपनीच्या यशस्वी वाटचालीसाठी गरजेच्या आहेत.

कामांचा नियमित आढावा, सूत्रबध्द नियोजन, विविध आव्हानांशी सामोरे जाण्याची तयारी व विविध अडचणींवर वेळेवर लक्ष देऊन संसाधनांचा योग्य समन्वय साधून त्या दिशेने काम करण्यासाठी सांघिक भावनेने सर्वांना प्रोत्साहित करावे, याकरिता मी सर्वांना मनापासून आवाहन करतो.

**शुभेच्छांसह..!**

**– डॉ. संजीव कुमार**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक




**मुंबई :** मा. उपमुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत ऊर्जा विभाग आणि ISEG फाऊंडेशन यांच्यात 'ऊर्जा संक्रमण ब्लू प्रिंट' संदर्भात सामंजस्य करार करण्यात आला. याप्रसंगी ऊर्जा विभागाच्या प्रधान सचिव श्रीमती आभा शुक्ला, 'महावितरण'चे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्रा, 'महापारेषण'चे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार, 'महानिर्मिती'चे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक पी. अनबलगन, 'महाऊर्जा'च्या महासंचालक डॉ. कादंबरी बलकवडे, स्वतंत्र संचालक श्री. विश्वास पाठक, ISEG फाऊंडेशनचे संचालक श्री. शिरीष संख्ये, श्री. सोहम बसू, श्री. अनंत गोएंका.

### ▶ मा. उपमुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांची उपस्थिती

# ऊर्जा विभाग आणि ISEG फाऊंडेशन यांच्यात 'ऊर्जा संक्रमण ब्लू प्रिंट' संदर्भात सामंजस्य करार

Follow us on :

मा. उपमुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत ऊर्जा विभाग आणि ISEG फाऊंडेशन यांच्यात 'ऊर्जा संक्रमण ब्लू प्रिंट' संदर्भात सामंजस्य करार करण्यात आला.

मंत्रालय येथील दालनात झालेल्या कार्यक्रमास ऊर्जा विभागाच्या प्रधान सचिव श्रीमती आभा शुक्ला, 'महावितरण'चे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्रा, 'महापारेषण'चे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार, 'महानिर्मिती'चे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक डॉ. पी. अनबलगन, 'महाऊर्जा'च्या महासंचालक डॉ. कादंबरी बलकवडे, स्वतंत्र संचालक श्री. विश्वास पाठक, ISEG फाऊंडेशनचे संचालक श्री. शिरीष संख्ये, श्री. सोहम बसू, श्री. अनंत गोएंका उपस्थित होते.

**'ऊर्जा संक्रमण ब्लू प्रिंट' संदर्भात सामंजस्य करार**

महाराष्ट्र राज्यासाठी 'ऊर्जा संक्रमण धोरण' विकसित करणे, आघाडीच्या भारतीय राज्यांसह आणि जागतिक स्तराच्या बेंचमार्कनुसार ऊर्जा संक्रमण थीम निश्चित करणे, मजबूत आणि सर्वसमावेशक जीडीपी वाढ देण्यासाठी, राज्याचे कार्बन आणि इतर उत्सर्जन लक्षणीयरित्या कमी करून रोजगार निर्मिती करणे, २०३० आणि २०३५ पर्यंत महाराष्ट्र राज्यासाठी ऊर्जेच्या मागणी आणि पुरवठ्याचा संभाव्य आराखड्याचे प्रारुप तयार करणे, वाढत्या नवीकरणीय ऊर्जेला सामावून घेण्यासाठी आणि ग्रीड पायाभूत सुविधा वाढवुन 'ग्रीन ग्रिड' संकल्पना विकसित करण्यासाठी राज्य सरकारला मदत करणे, वीज खरेदी करारातील खर्च कमी करणे आणि ३०-४० गिगावॅट अतिरिक्त अक्षय क्षमतेसाठी पुरवठा धोरण तयार करणे, क्षमतेमध्ये RTC (राऊंड द क्लॉक), हायब्रीड इत्यादींचा समावेश करणे, इलेक्ट्रिक बस, बॅटरी चार्जिंग इन्फ्रास्ट्रक्चर धोरणांचे बेंचमार्क आणि पुनरावलोकन करणे, ऊर्जेची कार्यक्षमता वाढवण्यासाठी हरित इमारतींसाठी बेंचमार्क आणि धोरणाचे पुनरावलोकन करणे, 'कचऱ्यातून संधी' बेंचमार्क आणि धोरणाचे पुनरावलोकन करणे, राज्यात ऊर्जा संक्रमणाला गती देण्यासाठी यंत्रणा आणि संस्थात्मक फ्रेमवर्क तयार करणे तसेच गती देण्यासाठी निधी, यंत्रणा आणि स्रोत सुचवणे, तज्ज्ञांचे बाह्य पॅनेल तयार करून राज्य सरकारला वेळोवेळी मदत करणे, ज्ञानाची देवाण-घेवाण सुलभ करण्यासाठी इव्हेंट,कार्यशाळा, वेबिनार, तज्ज्ञांच्या नेतृत्वाखाली चर्चा इत्यादीसारख्या संयुक्त कार्यक्रमांचे आयोजन आणि अंमलबजावणी करणे, ग्लोबल एनर्जी अलायन्स फॉर पीपल अँड प्लॅनेट (GEAPP), वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम (WEF), नॅशनल इन्व्हेस्टमेंट अँड इन्फ्रास्ट्रक्चर फंड (NIIF) प्लॅटफॉर्मसह काम करणे, केंद्रीय विद्युत प्राधिकरण (CEA), केंद्रीय विद्युत नियामक आयोग (CERC) आणि ग्रिड कंट्रोलर ऑफ इंडिया यांचे समवेत काम करणे तसेच मंजूर प्रकल्पांच्या जलद अंमलबजावणीसाठी 'ऊर्जा वॉर रूम' स्थापन करणे याचा यामध्ये समावेश असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

आमच्याशी कनेक्टेड रहा
@maha_transco
@maha_transco
MahaTransco
MahaTransco
Mahatranscoltd
MahaTransco

**इंजिनिअर्स डे**

▶ महापारेषणमध्ये राष्ट्रीय अभियंता दिन उत्साहात

# महापारेषणच्या अद्ययावत संकेतस्थळाचे डॉ. संजीव कुमार यांच्या हस्ते उद्घाटन

Follow us on :

भारतरत्न मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय अभियंता दिनाचे औचित्य साधून महापारेषणच्या ईआरपी-आयटी विभागाने संचलन व सुव्यवस्था विभागाकरिता तयार केलेल्या एसओआर (शेड्युल ऑफ रेट), महापारेषणचे अद्ययावत संकेतस्थळ तसेच अधिकारी वर्गाकरिता ड्रोन वापराबाबत डॅशबोर्डचे अनावरण महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार (भा.प्र.से.) यांच्या हस्ते झाले.

महाराष्ट्रवासियांचे जीवन सुसह्य झाले पाहिजे. महाराष्ट्राला सुरळीत व अखंडित वीजपुरवठा झाला पाहिजे, यासाठी महापारेषणच्या विविध प्रकल्पांची कामे वेगाने सुरू असून ती प्रगतिपथावर आहेत. महाराष्ट्रवासियांचे जीवन सुसह्य करण्यात महापारेषणच्या अभियंत्यांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे, अशा शब्दात महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार यांनी अभियंत्यांचा गौरव केला. तसेच भविष्यातही अखंडित व सुरळीत वीजपुरवठ्यासाठी चांगली व सातत्यपूर्ण कामगिरी करा, असा सल्लाही त्यांनी यावेळी अभियंत्यांना दिला.



**मुंबई :** भारतरत्न मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करताना महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार. शेजारी संचालक (संचलन) श्री. संदीप कलंत्री, संचालक (प्रकल्प) श्री. नसीर कादरी, संचालक (वित्त) श्री. अशोक फळणीकर, संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे, कार्यकारी संचालक (संचलन) श्री. रोहिदास मस्के, मुख्य अभियंता (स्थापत्य) श्री. भूषण बल्लाळ.

सुरुवातीला भारतरत्न मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी राष्ट्रीय अभियंता दिनाचे औचित्य साधून डॉ. संजीव कुमार यांनी सर्व अभियंत्यांना शुभेच्छा दिल्या.

यावेळी महापारेषणचे संचालक (संचलन) श्री. संदीप कलंत्री, संचालक (प्रकल्प) श्री. नसीर कादरी, संचालक (वित्त) श्री. अशोक फळणीकर, संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे, कार्यकारी संचालक (संचलन) श्री. रोहिदास मस्के, मुख्य महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) श्री. संतोष आंबेरकर, मुख्य महाव्यवस्थापक (सुरक्षा व अंमलबजावणी) श्री. कैलास कणसे, मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. सुधीर वानखेडे, मुख्य महाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान) श्री. नागसेन वानखेडे, मुख्य अभियंता श्री. पीयूष शर्मा, श्री. भूषण बल्लाळ यांचेसह विविध अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

▶ राज्यातील ठिकठिकाणच्या कार्यालयातही पंचप्रण शपथ

# महापारेषणमध्ये 'माझी माती, माझा देश' अभियानांतर्गत 'पंचप्रण शपथ'

Follow us on :

केंद्र सरकारच्या सूचनेनुसार राज्यात 'मेरी माटी, मेरा देश' अर्थात 'माझी माती, माझा देश' अभियानांतर्गत महापारेषणच्या सांघिक कार्यालय व राज्यातील ठिकठिकाणच्या कार्यालयात पंचप्रण शपथ घेण्यात आली.

वांद्रे येथील प्रकाशगंगा इमारतीत महापारेषणचे संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे यांनी 'भारतास २०४७ पर्यंत आत्मनिर्भर आणि विकसित राष्ट्र बनवण्याचे स्वप्न साकार करु. गुलामगिरीची मानसिकता मुळापासून नष्ट करु. देशाच्या समृध्द वारशाचा गौरव करु. भारताची एकात्मता बलशाली करु आणि देशाचे संरक्षण करण्यांप्रती सन्मान बाळगू. देशाचे नागरिक म्हणून सर्व कर्तव्यांचे पालन करु' ही पंचप्रण शपथ उपस्थित सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना दिली. तसेच महापारेषणच्या महाराष्ट्रातील ठिकठिकाणच्या कार्यालयात मुख्य अभियंता यांनी उपस्थित सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना पंचप्रण शपथ दिली.

याप्रसंगी मुख्य महाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. सुधीर वानखेडे, मुख्य अभियंता श्री. पीयूष शर्मा, महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) श्रीमती अंजू गुप्ता, महाव्यवस्थापक (मा.सं.आस्थापना) श्री. राजू गायकवाड, अधीक्षक अभियंता श्री. एकनाथ ढेंगळे, श्री. संजीवकुमार बद्देला, श्री. सचिन खडगी, सहायक महाव्यवस्थापक श्री. महेश सावंत, श्री. इमाम सिद्दीकी, श्री. महेश आंबेकर उपस्थित होते.



**मुंबई :** 'मेरी माटी, मेरा देश' अर्थात 'माझी माती, माझा देश' अभियानांतर्गत महापारेषणच्या सांघिक कार्यालयात पंचप्रण शपथ घेण्यात आली. याप्रसंगी महापारेषणचे संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे, मुख्य महाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. सुधीर वानखेडे, मुख्य अभियंता श्री. पीयूष शर्मा, महाव्यवस्थापक (मा. सं.आस्थापना) श्री. राजू गायकवाड, अधीक्षक अभियंता श्री. एकनाथ ढेंगळे, श्री. संजीवकुमार बद्देला.




**मुंबई :** रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी, भाईंदर येथे मानव संसाधन व कामगार विभागाच्या अधिकाऱ्यांसाठी आयोजिलेल्या दोन दिवसीय सक्षमीकरण परिषदेत (मल्हार-२०२३) बोलताना महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सूत्रधारी कंपनीचे संचालक श्री. विश्वास पाठक.

**मल्हार-२०२३** ▶ मानव संसाधन व कामगार विभागाच्या अधिकाऱ्यांची सक्षमीकरण परिषद

# कर्मचारी व कामगार संघटना यांच्यात सुसंवाद वाढवा : श्री. विश्वास पाठक

> **ज्याप्रमाणे अन्न, वस्त्र व निवारा या माणसाच्या मूलभूत गरजा आहेत. त्याप्रमाणे वीज ही अत्यावश्यक व मूलभूत गरज बनली आहे. या महत्त्वाच्या क्षेत्रात काम करताना मानव संसाधन व कामगार विभागाने सातत्याने कर्मचारी व कामगार संघटना यांच्यात सुसंवाद वाढविला पाहिजे.**
>
> **श्री. विश्वास पाठक**
> महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सूत्रधारी कंपनीचे संचालक

Follow us on :

महापारेषणच्या वतीने महानिर्मिती, महापारेषण व महावितरण या तिन्ही वीज कंपन्यांतील मानव संसाधन व कामगार विभागाच्या अधिकाऱ्यांची दोन दिवसीय सक्षमीकरण परिषद (मल्हार-२०२३) रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी, भाईंदर येथे आयोजित केली होती. त्या परिषदेत श्री. पाठक बोलत होते. यावेळी व्यासपीठावर महापारेषणचे संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे, महावितरणचे संचालक (मानव संसाधन) श्री. अरविंद भादीकर, महानिर्मितीचे कार्यकारी संचालक (मानव संसाधन) श्री. धनंजय सावळकर, महापारेषणचे मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. सुधीर वानखेडे, महावितरणचे मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. भूषण कुलकर्णी उपस्थित होते.

परिषदेच्या सुरुवातीला महापारेषणचे संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे यांनी प्रास्ताविकातून परिषदेमागची भूमिका विषद केली. तिन्ही कंपन्यांमध्ये मानव संसाधन व कामगार अधिकाऱ्यांशी समन्वय रहावा, यासाठी ही परिषद आयोजित केल्याचे त्यांनी सांगितले.

श्री. पाठक पुढे म्हणाले, ``पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदीजींच्या नेतृत्वात जी-२० परिषद दिल्लीत सुरू आहे. त्यामुळे विविध देशांतील प्रतिनिधी भारतासोबत विविध करार करीत आहेत.

भारताचा वेगाने विकास होत आहे. `वसुधैव कुटुंबकम` ही संकल्पना खऱ्या अर्थाने रूजत आहे. त्यामुळे भारत देश बदलतोय. वीज क्षेत्रातही आमुलाग्र बदल होत आहेत. महानिर्मिती, महापारेषण व महावितरण या तिन्हीही कंपन्या महत्त्वाच्या आहेत. यामध्ये मानव संसाधन विभागाची भूमिका खूप मोठी व व्यापक आहे. त्यासाठी त्यांनी वेगळा विचार (आऊट ऑफ बॉक्स) केला पाहिजे. खासगी वीज कंपन्यांशी स्पर्धा करताना आपण अधिकारी, कर्मचारी व कामगार संघटनेमध्ये सुसंवाद ठेऊन पारदर्शी कारभार ठेवला पाहिजे.''


@maha_transco MahaTransco @Mahatranscoltd www.mahatransco.in



**मुंबई :** महापारेषणच्या वतीने महानिर्मिती, महापारेषण व महावितरण या तिन्ही वीज कंपन्यांतील मानव संसाधन व कामगार विभागाच्या अधिकाऱ्यांची दोन दिवसीय सक्षमीकरण परिषद (मल्हार-२०२३) रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी, भाईंदर येथे आयोजित केली होती. त्या परिषदेत महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सूत्रधारी कंपनीचे संचालक श्री. विश्वास पाठक यांचा सत्कार करताना महापारेषणचे संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे. शेजारी महावितरणचे संचालक (मानव संसाधन) श्री. अरविंद भादीकर, महानिर्मितीचे कार्यकारी संचालक (मानव संसाधन) श्री. धनंजय सावळकर, महापारेषणचे मुख्य महाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. सुधीर वानखेडे

यावेळी श्री. विश्वास पाठक यांचा सत्कार श्री. सुगत गमरे यांनी केला. श्री. सुगत गमरे यांचा सत्कार श्री. सुधीर वानखेडे यांनी केला. श्री. धनंजय सावळकर यांचा सत्कार श्री. आनंद कोंत यांनी केला. श्री. सुधीर वानखेडे यांचा सत्कार श्री. राजू गायकवाड यांनी केला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाव्यवस्थापक (मा.सं.मनुष्यबळ नियोजन) श्री. राजू गायकवाड, उपमहाव्यवस्थापक (मा. सं.मनुष्यबळ नियोजन) श्री. नितीन कांबळे, उपमहाव्यवस्थापक (मा. सं.आस्थापना) श्री. अभय रोही, अधीक्षक अभियंता (प्रशिक्षण) श्री. संजीवकुमार बद्देला, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भरत पाटील, शिष्टाचार अधिकारी श्री. सतिश जाधव, जनसंपर्क अधिकारी डॉ. मिलिंद आवताडे, उपकार्यकारी अभियंता श्री. अमित सरोदे, उपव्यवस्थापक (शिष्टाचार विभाग) श्री. जयवंतराव साबळे यांच्यासह वरिष्ठ अधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार व्यवस्थापक (मा.सं.) श्री. महेश आंबेकर यांनी मानले.



**मुंबई :** महापारेषणच्या वतीने महानिर्मिती, महापारेषण व महावितरण या तिन्ही वीज कंपन्यांतील मानव संसाधन व कामगार विभागाच्या अधिकाऱ्यांसाठी आयोजिलेल्या दोन दिवसीय सक्षमीकरण परिषदेत सहभागी झालेले अधिकारी.

आम्ही भारताचे लोक

अधिकारी व कर्मचाऱ्यांची मोठी उपस्थिती

# महापारेषणमध्ये भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेचे थाटात अनावरण

Follow us on :



**मुंबई :** महापारेषणचे मुख्यालय असलेल्या प्रकाशगंगा इमारतीत बसविण्यात आलेल्या भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेचे अनावरण करताना महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार (भा.प्र.से.) शेजारी संचालक (संचलन) श्री. संदीप कलंत्री, संचालक (प्रकल्प) श्री. नसीर कादरी, संचालक (वित्त) श्री. अशोक फळणीकर, संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे व वरिष्ठ अधिकारी वर्ग.

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीचे (महापारेषण) मुख्यालय असलेल्या प्रकाशगंगा येथे भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेचे अनावरण महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार (भा.प्र.से.) यांच्या हस्ते स्वातंत्र्यदिनी थाटात करण्यात आले.

जगातील सर्वात मोठे लिखित राष्ट्रीय संविधान आहे. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर की जय, भारतीय संविधानाचा विजय असो... अशा घोषणा देत अधिकारी व कर्मचाऱ्यांनी कार्यक्रमाला मोठी उपस्थिती लावली होती.

भारतीय संविधानाचा प्रचार व प्रसार व्हावा, संविधानाविषयी अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या जाणीवजागृती व्हावी, देशात एकात्मता, समता व बंधुता रूजावी, यासाठी महापारेषणच्या क्षेत्रीय कार्यालयातही भारतीय संविधानाची प्रास्ताविका बसविण्यात येणार असल्याचे महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार यांनी यावेळी सांगितले.

याप्रसंगी महापारेषणचे संचालक (संचलन) श्री. संदीप कलंत्री, संचालक (प्रकल्प) श्री. नसीर कादरी, संचालक (वित्त) श्री. अशोक फळणीकर, संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे, कार्यकारी संचालक (संचलन) श्री. रोहिदास मस्के, मुख्य महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) श्री. संतोष आंबेरकर, मुख्य महाव्यवस्थापक (सुरक्षा व अंमलबजावणी) श्री. कैलास कणसे, मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. सुधीर वानखेडे, मुख्य महाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान) श्री. नागसेन वानखेडे, मुख्य अभियंता श्री. पीयूष शर्मा, श्री. भूषण बल्लाळ यांचेसह विविध अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महापारेषण कंपनीतील वरिष्ठ अधिकाऱ्यांची नियुक्ती-निवृत्ती माहे ऑगस्ट-सप्टेंबर २०२३

### नियुक्ती

| अ.क्र. | नाव (सर्वश्री) | पद | पदस्थापनेचे ठिकाण | दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | नितिकेत गादे | अधीक्षक अभियंता (पारेषण) | मुख्य कार्यालय, मुंबई | १८. ०८. २०२३ |
| २ | श्रीमती शारदा ताकपेरे | अधीक्षक अभियंता (पारेषण) | मुख्य कार्यालय, मुंबई | १८. ०८. २०२३ |
| ३ | पराग भंगाळे | अधीक्षक अभियंता (पारेषण) | अउदा संवसु मंडल, पनवेल | २१. ०८. २०२३ |
| ४ | किशोर गरुड | अधीक्षक अभियंता (पारेषण) | मुख्य कार्यालय, मुंबई | १८. ०८. २०२३ |
| ५ | मनिष खत्री | अधीक्षक अभियंता (पारेषण) | अउदा संवसु मंडल, भुसावळ | २१. ०८. २०२३ |
| ६ | श्रीमती वर्षा असोलकर | उप महाव्यवस्थापक (माहिती तंत्रज्ञान) | मुख्य कार्यालय, मुंबई | ०१. ०९. २०२३ |

### निवृत्ती

| अ.क्र. | नाव (सर्वश्री) | पद | पदस्थापनेचे ठिकाण | दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | सतीश गायकवाड | अधीक्षक अभियंता (स्थापत्य) | अउदा स्थापत्य मंडल, पुणे | ३०. ०९. २०२३ |
| २ | रवींद्र नागरे | अधीक्षक अभियंता (पारेषण) | अउदा प्रकल्प मंडल, कळवा | ३०. ०९. २०२३ |


@maha_transco MahaTransco @Mahatranscoltd www.mahatransco.in










**मुंबई :** महापारेषणचे मुख्यालय असलेल्या प्रकाशगंगा इमारतीत ध्वजारोहणप्रसंगी मानवंदना देताना महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार. दुसऱ्या छायाचित्रात ध्वजारोहणप्रसंगी उपस्थित वरिष्ठ अधिकारी वर्ग. तिसऱ्या छायाचित्रात प्रकाशगंगा इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावरील नूतनीकरण केलेल्या दालनाचे उदघाटनही डॉ. संजीव कुमार यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी संचालक (संचलन) श्री. संदीप कलंत्री, कार्यकारी संचालक (संचलन) श्री. रोहिदास मस्के, मुख्य अभियंता (स्थापत्य) श्री. भूषण बल्लाळ, मुख्य महाव्यवस्थापक (सुरक्षा व अंमलबजावणी) श्री. कैलास कणसे.

# महापारेषणमध्ये ७७ वा भारतीय स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा

Follow us on :

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी अर्थात महापारेषणचे मुख्यालय असलेल्या प्रकाशगंगा येथे ७७ वा भारतीय स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला.

सुरूवातीला महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार (भा.प्र.से.) यांनी ध्वजारोहण केले. त्यानंतर त्यांनी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा दिल्या. महापारेषणमध्ये बसविण्यात आलेल्या भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेचे अनावरण डॉ. संजीव कुमार यांच्या हस्ते झाले. प्रकाशगंगा इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावरील नूतनीकरण केलेल्या केबिनचे उदघाटनही डॉ. संजीव कुमार यांच्या हस्ते झाले. ईआरपी-आयटी विभागाने तयार केलेल्या एसओआर (शेड्युल ऑफ रेट) तसेच अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या रजा नोंदणीकरणाबाबत मोबाईल ॲपचे अनावरणही डॉ. संजीव कुमार यांच्या हस्ते झाले.

यावेळी महापारेषणचे संचालक (संचलन) श्री. संदीप कलंत्री, संचालक (प्रकल्प) श्री. नसीर कादरी, संचालक (वित्त) श्री. अशोक फळणीकर, संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे, कार्यकारी संचालक (संचलन) श्री. रोहिदास मस्के, मुख्य महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) श्री. संतोष आंबेरकर, मुख्य महाव्यवस्थापक (सुरक्षा व अंमलबजावणी) श्री. कैलास कणसे, मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. सुधीर वानखेडे, मुख्य महाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान) श्री. नागसेन वानखेडे, मुख्य अभियंता श्री. पीयूष शर्मा, श्री. भूषण बल्लाळ यांचेसह विविध अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी अल्पोपहाराने कार्यक्रमाची सांगता झाली.






## चॅनेलला असे करा फॉलो :

**व्हॉटसॲपवरील 'अपडेट्स' मेनूमध्ये गेल्यावर तिथे चॅनेल सेक्शन असून तिथे 'Find channels' मध्ये 'Maha-Transco' हे टाइप केल्यावर चॅनेलच्या यादीमध्ये हे प्रमाणित चॅनेल दिसेल, त्याला क्लिक करुन फॉलो केले की तुम्हाला सर्व अपडेट्स विनासायास उपलब्ध होणार आहेत. https://whatsapp.com/channel/0029Va9PkboBadmWFo3g162t या लिंकवर व्हॉटसॲपधारकांनी क्लिक केल्यास 'MahaTransco' चॅनेलला फॉलो करता येणार आहे.**

### ▶ संचलन, प्रकल्पे व कार्यक्रमांची अचूक, अधिकृत माहिती मिळणार

# महापारेषण कंपनी आता व्हॉट्सॲप चॅनलवर!

Follow us on :

देशातील सर्वात मोठी पारेषण कंपनी म्हणून ओळखली जाणारी महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी अर्थात महापारेषण आता थेट व्हॉट्सॲपद्वारे 'कनेक्ट' झाली आहे. महापारेषणच्या सद्यस्थितीतील प्रकल्पांची माहिती, संचलन व कार्यक्रमांची अचूक, अधिकृत माहिती या चॅनेलच्या माध्यमातून आता थेट जनतेपर्यंत पोहोचवली जाणार आहे.

जगभरात संवादाचे प्रभावी व उपयुक्त माध्यम ठरलेल्या 'व्हॉट्सॲप'ने चॅनेलच्या माध्यमातून नवीन प्लॅटफॉर्म उपलब्ध करून दिला असून त्यावर दि. २१ सप्टेंबर महापारेषणने स्वतंत्र चॅनेल सुरु केले आहे. प्रमाणित असलेल्या या चॅनेलला वापरकर्त्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून चॅनेल सुरु केल्यानंतर काही वेळेतच वापरकर्त्यांनी चॅनेलला फॉलो केले आहे.

महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार यांच्या नेतृत्वाखाली राज्यात महापारेषणचे विविध प्रकल्प वेगाने व प्रगतिपथावर सुरू आहेत. महापारेषणच्या विविध प्रकल्पांची अचूक आणि वस्तुनिष्ठ माहिती, जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याचे निर्देश अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार यांनी दिले आहेत. आता हातातील स्मार्ट फोनवर थेट महापारेषणची माहिती मिळत असल्याने हा संवाद अधिक प्रभावी होणार आहे.

महापारेषणच्या जनसंपर्क विभागामार्फत (सांघिक सुसंवाद कक्ष) अधिकारी, कर्मचारी व जनतेला माहिती देण्यासाठी सध्या एक्स (ट्विटर), फेसबुक, इन्स्टाग्राम, यु ट्यूब, थ्रेड्स, टेलिग्राम आदी समाजमाध्यमांचा वापर केला जातो. व्हॉटसॲपने गेल्या आठवड्यात चॅनेलची घोषणा केल्यानंतर महापारेषणने 'MahaTransco' या नावाने स्वतंत्र, प्रमाणित चॅनेलचा 'श्रीगणेशा' केला आहे. या चॅनेलला वापरकर्त्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून काही तासांतच बहुतांश वापरकर्त्यांनी या चॅनेलचे अनुसरण केले आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्य अभियंता श्री. महेंद्र वाळके यांनी केले. सूत्रसंचालन श्रीमती विभावरी बाविस्कर, श्री. रितेश चौधरी, श्री. उमर तांबोळी यांनी केले. आभार श्री. मोहन ननवरे यांनी मानले.

संपादक : डॉ. मिलिंद आवताडे, जनसंपर्क अधिकारी (महापारेषण)
E-mail : prohr@mahatransco.in
पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, महापारेषण समाचार, प्रकाशगंगा इमारत, महापारेषण कंपनी मर्यादित, प्लॉट नं.सी.-१९, ई-ब्लॉक, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१ (खाजगी वितरणासाठी)

Printed & Published by **Dr.Milind Awatade** PRO for **Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.,** Printed at **Jyotirling Enterprises :** 315-B. Deen Bldg. Compound, Shop No. 32, N.M. Joshi Marg, Lower Parel (E), Mumbai - 400 011. Tel. No.: 23002574 & Published at Prakashganga, Bandra-Kurla Complex, Mumbai - 400 051. The Company accepts no responsibility for the matter published in the journal.